ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

Scanned with CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner



# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान

- प्रा. डॉ. गणेश मालटे

- भागवत भास्करराव पाटील

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा

---

वामन कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ साली नाशिक जिल्ह्यातील ता. सिन्नर मधील देशवंडी या छोट्याशा खेड्यात झाला. वडील तबाजी कर्डक, आई सईबाई, मोठा भाऊ सदाशिव तर धाकटी बहीण सावित्री असा वामनदादांचा परिवार होता. त्यांच्या घरी १८ एकर शेती होती. धान्य घरात यायचे तरीही हंगाम संपला की आईने डोंगरात जाऊन लाकडे गोळा करून मोळी बांधून ते जळतण सिन्नर बाजारात विकायचे. वडील टेंभुर्णीच्या पानाच्या विड्या करून विकायचे व हेडीचा धंदा करायचे. सर्वांनी कष्ट केल्यावरही आषाढ श्रावणात आबाळ व्हायची. कधी तरवट्याची भाजी, माठाची भाजी, कधी भाकरीच खावी लागायची.

कर्डकांनी लहानपणी गुरे चारणे, जत्रेत कुस्त्या खेळणे, शिवडी येथे गिरणी कामगाराची नोकरी करणे, मातीकाम, सिमेंट काँक्रीटचे काम, चिक्की विकणे, आईसफ्रूट विकणे, खडी फोडणे, टाटा ऑईल मिलमध्ये नोकरी, इत्यादी कामे केली. त्यांना वाचनाचा छंद होता तसेचत्यांनी लल्लाट लेख या नाटकात घुमा या पात्राची भूमिका केली होती.

वयाच्या १९-२०व्या वर्षी वामनचे लग्न अनुसया नावाच्या मुलीशी झाले पुढे त्यांच्या कुटुंबात मीरा नावाच्या मुलीने जन्म घेतला. वामनदादांचे जीवन सुखात गेले नाही बायको त्यांना सोडून गेली आणी पुढे आजारपणात मीराचेही निधन झाले. हा त्यांचा जीवनाला फार मोठा धक्का होता, ते मीराचे दुःख कधीही विसरू शकले नाहीतमुलगी मीराच्या निधनानंतर पुढे आईसोबत पोटाची खळजी भरण्याकरिता वामनदादा मुंबईत आले. त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले कोळशाच्या वखारीत कोळसा उचलला. चिक्की विक्रीचा, आईस फ्रूट विक्रीचा धंदा केला. मिळेत ते काम केले. नंतर त्यांना टाटा कंपनीत नोकरी मिळाली. शिवडीच्या बीडीडी चाळीत राहत असतांना ते समता सैनिक दलात सामील झाले. इथपर्यंत वामनदादांना अक्षरांचा परिचय नव्हता.

एकदा त्यांच्या चाळीमधीस एका मनासाने वामनदादांना पत्र वाचायला सांगितले. दादांना पत्र वाचता लिहिता येत नव्हते. याचे त्यांना खूप वाईट वाटले शिक्षण नसल्यामुळे आपण लिहू-वाचू शकत नाही हे त्यांना अवघड वाटू लागले व ते रडू लागले. आणि ते देहलवी नावाच्या मास्तरांकडून बाराखडी, मुळाक्षरे शिकली. जोडाक्षरे ते दुकानाच्या पाट्या, बोर्ड वाचून शिकले. हळू-हळू त्यांचे लेखन वाचन वाढू लागले सोबतच ते विविध खेळही खेळायचे व व्यायामही करायचे.

त्यावेळी आंबेडकरी चळवळ सर्वत्र वेगाने जोर धरू लागली. आंबेडकरांचे अनुयायी समतेच्या लढ्यात उतरले होते वामनदादाही बाबासाहेबांच्या सभेला जात. समता सैनिक दलातील तरुणांसोबत काठीला काठी लावून बाबासाहेबांना सभास्थानी जायला रस्ता करून देत. नायगाव येथे १९४३ साली वामन कर्डक यांनी बाबासाहेबांना पहिल्यांदा पाहिले होते

विशेष म्हणजे ते डाव्या हातानेच पेटी वाजवीत असत. त्यांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणतः दहा हजारांच्या आसपास गीतरचना असल्याचा अंदाज आहे त्यांच्या हयाती र काव्यसंग्रह प्रकाशित झाले होते बुद्ध, फुले,



Scanned with CamScanner

आंबेडकर यांचे विचार वामनद स्थान होते

वामनदादा कर्डक आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्याझोपड्यातून गेले. आपल्या कविता मागची भूमिका स्पष्ट करतांना ते म्हणतात " मी जेथे जन्मलो, ज्या मातीत वाढलो आणि ज्या अन्यायाखाली भरडला गेलो त्याची मला आठवण आहे. ती कैफियत मी शब्दात मांडतो . त्याला तुम्ही कविता म्हणा किंवा म्हणू नका . मला जे प्रामाणिकपणे जाणवले ते मांडले ". त्यांची बाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रद्धा आहे . त्यांच्या नेतृत्वावर त्यांचा विश्वास आहे . त्यांनी या दलितांच्या मनात जळजळीत अंगार पेटविला. ते म्हणतात -

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मूळी न आम्हा शिवे

क्रांतीचे गीते उच्च स्वरात गाणारा वामन कर्डक सारखा कवी बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर अस्वस्थ होतो स्वतंत्र भारतात दलित जमातीवर होणाऱ्या गावोगावच्या अत्याचाराच्या कथा त्यांना सुन्न करतात. त्या अत्याचाराविरुद्ध दलित मन चिडत का नाही , पेटून उठत का नाही त्यामुळे ते खन्तावतात . त्यांच्या मनातले प्रचंड वादळ चित्रित करतांना प्रा. पानतावणे म्हणतात

भिमरावाच्या समृद्ध मळ्याला आलेली अवकळा पाहून कवी विषण्ण होतो. पोटच्या लेकारागत ज्याला राखला , झारी घेऊन जिथे एकेक रोपावर जलसिंचन केले , तो मळा आता दुहीने पेटलेला आहे . एकीचा जोंधळा आता वाळून चालला आहे . कवीने व्यक्त केलेल्या ह्या भावना संवेद्ण आहेत . भिमापाठी अन्यायाने पुन्हा उसळी मारली आहे . लेकी बहिणींची अब्रू बेदरकारपणे लुटली जात आहे . घरे जाळली जात आहेत . निघ्रून छळ चाललेला आहे . पण सारेच मूग गिळून बसत आहेत. चिडच नष्ट झाली आहे ." कर्डकांची वेदना कुणालाही जाणवेल . त्यांची कविता म्हणजे त्यांच्या मनात ठसठसत असलेले दुख; त्यांची कविता म्हणजे त्यांच्या संवेदनशील मनाचे आवेग! ते म्हणतात -

भीम माझ्यामध्ये होता , मान ताठ होती माझी
माझ्यातला भीम इथे , मीच केला उणा , दोष देऊ कुणा

कर्डकांच्या कवितेतील हे दुखः बाबासाहेब निधन पावल्यानंतर दलित समाजाला जाणवणाऱ्या पोरकेपणाचे आहे . कर्डकांचे कवी मन बाबासाहेबं विषयी कृतज्ञेने भरलेले आहे . दादर च्या चैत्य भूमीवर उभे राहतांना ते म्हणतात-

समाधीकडे त्या वाटही वळावी
जिथे आसवांची फुलेही गालावी
जिथे माउलीची चिता हि जळाली
धूळ त्या स्थळाची मस्तकी मळावी .

दादांनी डॉक्टर आंबेडकरांचे विचार गाण्यांमधून सर्वांपर्यंत पोहोचवा चा विडा उचलून संपूर्ण महाराष्ट्र मध्य प्रदेश व गुजरात येथे जाऊन आपल्या आवाजाचा करिश्मा दाखवला त्यांना पटकथालेखक कथाकार अभिनेता बघायची खूप इच्छा होती ते कामासाठी अनेक चित्रपट कंपन्या मध्ये गेले तरी त्यांना मिनर्वा फिल्म कंपनीत एक्स्ट्रा म्हणून प्रवेश मिळाला जेव्हा काम नसेल तेव्हा ती राणीबागेत तासंतास बसायचे तेथेच त्यांना पहिले हिंदी गीता चे विडंबन गीत सुचले होते त्यंनी तीन 1943 रोजी चाळीतील लोकांसमोर गाऊन दाखवली आणि त्यांच्यातील कवी लोकांपुढे ला सांग त्या एका या चित्रपटाचा रोप्य महोत्सव झाल्यावर दिग्दर्शक अनंत माने यांच्या डोक्यात या चित्रपटात एक नवे गाणे टाका टाकावी अशी कल्पना आली वसंत पवार आणि शाहीर वामनदादा कर्डक यांचे अहो सांगा या अहो सांगा या वेड्याला माझ्या घरधन्याला क्शी जाऊ सांगा मी सासुरवाडीला हे गीत निवडलं हे गीत वसंत पवार यांनी संगीतबद्ध केलं आणि विठ्ठल शिंदे यांच्याबरोबर कुमुदिनी छेणेकर यांच्या कडून गाऊन घेतले हो अहो पाहुना सुखाचा मेव्हणा आहे वामनदादा चे गीत मधुकर पाठक यांनी संगीतबद्ध केलेव श्रावण यशवते यांनी गायलेले त्यांना साहित्य संस्कृती मंडळाचे उत्कृष्ट कविरत्न महाराष्ट्र राज्य शासनाचा दलित मित्र पुरस्कार असे एकूण सुमारे पंचवीस पुरस्कार मिळाले नाशिक आणि बुलढाण्यात त्यांची नाणे तुलाही झाली महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाने व महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि ते तीन वर्षे सदस्य होते .

'कानात काल माझ्या माझे मरण म्हणाले, तन मन तुलाच माझे आले शरण म्हणाले'. अशा एकापेक्षा एक अर्थपूर्ण गझल लिहिलेल्या वामनदादा कर्डक यांना लोककवी म्हणून सर्वदूर ओळख मिळाली असली तरी गझलकार म्हणून ते



Scanned with CamScanner

दुर्लक्षितच राहिले. त्यांना ही ओळख मिळावी, यासाठी त्यांच्या साहित्याचे अभ्यासक नाशिकचे नंदकुमार साळवे अहोरात्र झटत आहेत.

'सांगा आम्हाला बिर्ला बाटा टाटा कुठे हाय हो, सांगा धनाचा साठा न आमचा वाटा कुठे हाय हो अशा कवनांनी साम्राज्यशाहीला वामनदादांनी आव्हान दिले होते. सन १९२० ते १९५६ हा आंबेडकर चळवळीचा कालखंड होता या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर वामनदादांनी फिरून समाजजागृतीचे काम केले होते. बाबासाहेबांबरोबर फिरत असताना आपल्या कवनांनी वामनदादांनी सपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढलाया गीतांबरोबरच वामनदादांनी तब्बल १५० हिंदी, तर १०० पेक्षा अधिक मराठी गझल लिहिल्या, परंतु त्या फारशा प्रसिद्धीस आल्याच नाहीत. वामनदादांच्या अनेक गीतांना बाबासाहेब आंबेडकरांनी बक्षिसे दिली सुरेश भट हे प्रसिद्ध गझलकार वामनदादांना गुरुस्थानी मानत होते दोघांनी गझल लिहिल्या, परंतु त्यांचे मार्ग वेगळे ठरले. सुरेश भटांनी समांतर साहित्याचा मार्ग स्वीकारला, तर वामनदादांनी केवळ आंबेडकरी चळवळीवर गझल लिहिल्या. 'काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता, साथ थिगळाच्या बंडीला माझा खिसा होता' अशा गझलांनी वातावरण भारून जात असे. वामनदादांनी पहिली गझल १९५५ साली लिहिली, तिचे बोल होते 'माणसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे तुझे हित व्हावे, एकाने हसावे लाखाने रडावे तुझे दुख: सारे गळूनी पडावे.' त्यांच्यानंतर दोन वर्षांनी सुरेश भटांनी १९५७ साली पहिली गझल लिहिली. त्यामुळे वामनदादा आद्य गझलकार ठरतात, असा दावा साळवे करतात. वामनदादांना गझलकार म्हणून ओळख मिळावी, यासाठी गझलगुंफा नावाचा अंक दरवर्षी प्रकाशित केला जातो यात महाराष्ट्रातील गझलकार वामनदादांच्या गझलांचा अभ्यास करून विश्लेषण लिहीत असतात यामध्ये सुफी, भाव, अशा विविध प्रकारच्या गझलांचा समावेश असतो. वामनदादांची पुण्यतिथी १५ मे रोजी असते. यानिमित्ताने दरवर्षी गझल संमेलनाचे आयोजन केले जाते. सन २०१८ मध्ये हे संमेलन नाशिकमध्ये झाले होते. वामनदादांच्या गझलांमधील सौंदर्य, आशय, तंत्रशुद्धता आताच्या पिढीला समजावी हा त्यामागचा हेतू. लोककवी म्हणून मान्यता पावलेले वामनदादा गझलकार या बिरुदाला मात्र पारखेच राहिले.

वामनदादा लोक गीतकार म्हणून जनमानसात प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या गीतांमधून समाजजागृतीचे काम केले आहे. त्याचबरोबर गझलांमधून जनतेत सामान्य नागरिकांचे दुख मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा वामनदादांना गीतकार म्हणून जशी मान्यता मिळाली, तशीच गझलकार म्हणून मान्यता मिळावी, यासाठी प्रयत्नशील आहे.

**निष्कर्ष :-**

१) वामनदादा लोक गीतकार म्हणून जनमानसात प्रसिद्ध आहेत

२) वामनदादा कर्डक आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्याझोपड्यातून गेले

३) त्यांची डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रद्धा होती.

४) डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता त्यांनी या दलितांच्या मनात वैचारिक क्रांतीचा विचार पेरला

५) एकापेक्षा एक अर्थपूर्ण गझल वामनदादा कर्डक यांनी लिहिल्या

**संदर्भ :-**


१) 'एका कवीचे जीवनगाणे' ही वामन कर्डक यांची चरित्रकथा असून त्याचे लेखक बब्न लोंढे हे आहेत.

२) आंबेडकरी प्रतिभेचा महाकवी : वामनदादा कर्डक - लेखक: डॉ. अशोक जोंधळे व डॉ. शत्रुघ्न जाधव, प्रतिभास प्रकाशन - परभणी

३) आंबेडकरवादी वामनदादा कर्डक, लेखक - यशवंत मनोहर

४) लोकशाहीर वामनदादा कर्डक गौरव अंक प्रकाशन (१९८७) - प्रा. ऋषिकेश कांबळे

५) लोकशाहीर वामनदादा कर्डक गौरव ग्रंथ प्रकाशन (२००१) - मधुकर भोळे ६) आंबेडकरवादी महागीतकार वामनदादा कर्डक, लेखक - यशवंत मनोहर

७) 'वामनदादा कर्डक यांची गीत रचना' - प्रा. डॉ. परशुराम गिमेकर संपादित लेख संग्रह


◆◆◆◆◆




Scanned with CamScanner